अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | मंगळवार, दि. ४ जुलै २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : २७५ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## विजेचा शॉक बसल्याने शेतकऱ्याच्या मृत्यू

✔ सुराज्य/सोलापूर

शेतातून घराकडे पायी जात असताना वाटेत तुटून पडलेल्या विद्युत वाहिनीचा शॉक बसल्याने शेतकरी जखमी होऊन मरण पावले. ही दुर्घटना बीबीदारफळ (ता.उत्तर सोलापूर ) येथे रविवारी सायंकाळच्या सुमारास घडली.

पुरुषोत्तम तुळशीराम चौरे (वय ४८ रा. बीबीदारफळ ता.उत्तर सोलापूर) असे मयत झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. काल सायंकाळी सहा ते साडेसहा वाजेच्या सुमारास ते आपल्या शेतातून पायी घराकडे निघाले होते. शेताजवळच्या गणेश चौरे यांच्या वाड्याजवळ पोल वरील तुटून पडलेल्या वायरचा स्पर्श झाल्याने ते बेशुद्ध पडले होते.घरातील लोकांनी रात्री शोध घेतला मात्र ते आढळले नव्हते. आज सोमवारी सकाळी आढळल्यानंतर त्यांचे बंधू धनाजी चौरे यांनी त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ते मयत झाल्याचे डॉक्टरांनी जाहीर केले. मयत पुरुषोत्तम चौरे यांच्या पश्चात पत्नी आणि एक भाऊ असा परिवार आहे. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

# राष्ट्रवादीत माजली यादवी, सुडाचे राजकारण पेटले

▸ एकमेकांवर कारवाईचे अस्त्र उपसले...

▸ काका-पुतण्याच समोरासमोर उभे ठाकले...

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अजित पवारांच्या बंडानंतर अक्षरशः यादवी माजली आहे. एकीकडे शरद पवार तर दुसरीकडे अजित पवार या काका-पुतण्यांनी पक्षावर आपलाच ताबा असल्याचा दावा केला आहे. बंडानंतर दुसऱ्या दिवशी (सोमवारी) पक्षात यादवी माजल्याचे दिसून आले. आता काका-पुतण्याकडून कारवाईचे अस्त्र उपसण्यात आले आहे. या लढाईत कोण कुणाला हरवणार? असा प्रश्न कार्यकर्त्यांपुढे उभा राहिला आहे.शरद पवारांनी राष्ट्रीय अध्यक्ष या नात्याने ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल व माजी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यावर कारवाई केली आहे तर विद्यमान प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व आ.जितेंद्र आव्हाड यांना अपात्र ठरवण्याबाबत रविवारीच सभापतींकडे पत्र दिल्याने अजित पवारांनी सांगितले.एकूणच राष्ट्रवादीत सुडाचे राजकारण पेटले आहे. एकमेकांना संपवण्यासाठी कारवाईचे घाव घातले जात आहेत.पक्षात हलकल्लोळ माजल्याने कार्यकर्ते सैरभैर झाले आहेत.**





बंडानंतर शरदराव यांनी सोमवारपासून राज्याचा दौरा सुरू केला. साताऱ्यात त्यांनी बंडखोरांविषयी आणि भाजपच्या फोडाफोडीच्या राजकारणावर आक्रमक भूमिका घेत राष्ट्रवादी हा पक्ष पुन्हा नव्या उमेदीने उभा करू,असा निर्धार केला. त्यामुळे बंडखोरांचा तंबू हादरला आहे. दरम्यान शरदराव आणि अजित पवार यांनी एकमेकांच्या गटाविरुद्ध कारवाईचे अस्त्र उगारून एकमेकांना आव्हान देण्यास सुरूवात केली आहे. शपथविधीच्या वेळी शरद पवार यांचे अत्यंत विश्वासू समजले जाणारे माजी केंद्रीय मंत्री प्रफुल्ल पटेल व राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार सुनील तटकरे हे अजित पवारांबरोबर दिसले. यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या. ते दोघेही राष्ट्रवादीच्या कार्यकारिणीचे सदस्य होते. या दोन्ही नेत्यांना अलीकडेच पक्षात केंद्रीय नेतृत्वात मोठी पदे देण्यात आली होती. परंतु या दोन्ही नेत्यांनी बंडखोरी केल्यामुळे या दोन्ही नेत्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सदस्य नोंदणीतून काढून टाकण्यात आल्याची माहिती शरद पवार यांनी ट्विटरवरून दिली. मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राष्ट्रीय अध्यक्ष या नात्याने पक्षविरोधी कारवाया केल्याबद्दल सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांची नावे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सदस्य नोंदणीतून काढून टाकण्याचे आदेश देत आहे, असे पवारांनी म्हटले आहे.

### जशास तसे उत्तर

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी पक्षातील बंडखोरीनंतर अजित पवारांसह ९ आमदारांना अपात्र करण्याचे पत्र विधानसभा अध्यक्षांकडे दिले. यानंतर अजित पवारांनी मोठी खेळी केली. शरद पवारांच्या गटाकडून करण्यात आलेल्या कारवाईला अजित पवार गटाकडून जशास तसे उत्तर दिले आहे. यानुसार जयंत पाटील आणि जितेंद्र आव्हाड यांच्यावर एक दिवसाआधीच म्हणजेच रविवारी कारवाई केल्याचे अजित पवार यांनी सोमवारी मुंबईत पत्रकार परिषदेत सांगितले.मी राष्ट्रवादीच्या आमदारांनी आणि पक्षाने निवडून दिलेला विधीमंडळ पक्षनेता आहे. त्यामुळे जयंत पाटील आणि जितेंद्र आव्हाड यांना अपात्र करण्याच्या संदर्भात विधानसभा अध्यक्षांकडे पत्र दिल्याचेही त्यांनी सांगितले.

### जयंतरावांनीही अस्त्र उगारले...

नऊ बंडखोर आमदारांचे सदस्यत्व रद्द करण्याची याचिका विधानसभा अध्यक्षांकडे ईमेलद्वारे दाखल केल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी दिली. या याचिकेवर अभ्यास करून ९ आमदारांच्या अपात्रतेवर निर्णय घेणार असल्याचे मोठे वक्तव्य विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केले.याचिकेत नमूद केलेल्या मुद्द्यांचा अभ्यास करून योग्य निर्णय घेतला जाईल,असेही ते म्हणाले.

### जयंतरावांचा आक्षेप

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ९ सदस्यांनी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व प्रदेशाध्यक्ष यांना कोणतीही कल्पना न देता पक्ष धोरणाच्या, हिताच्या विरोधात कारवाया करत शपथ घेतली. ती त्यांची कृती बेकायदेशीर असून पक्षाला अंधारात ठेवल्याने याबाबत एका सदस्याने शिस्तभंग समितीकडे तक्रार केली. त्यानंतर समितीच या सूचनेवरून पाटील यांनी ही याचिका दाखल केली.

### बंडखोर धास्तावले...

बंड केल्यानंतर आपल्यासोबत ३० आमदार असल्याचा दावा अजित पवारांनी केला. शरद पवारांनी आक्रमक पवित्रा घेताच ९-१० आमदारांनी पवित्रा बदलला. जुन्नरचे आमदार अतुल बेनके, अकोलेचे आमदार किरण लहामटे, पुसदचे आमदार इंद्रनील नाईक यांनी तटस्थ भूमिका घेतली. अजित पवारांसोबत असलेल्या आमदारांची भाषा अचानक बदलू लागली आहे. विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवळ नॉट रिचेबल झाले आहेत. शहापूरचे आमदार दौलत दरोडा अजित पवारांसोबत उपस्थित होते. मात्र सोमवारी त्यांनी थेट शरद पवारांच्या समर्थनाची भूमिका घेतली. आता थांबणे नाही. महाराष्ट्र पिंजून काढणार, जनतेत जाणार आणि पक्ष पुन्हा उभा करणार, असा निर्धार शरद पवारांनी बोलून दाखवला. यावेळी शरद पवारांची देहबोली कमालीची आश्वासक वाटत होती.

## रिक्षा पलटून दोन विद्यार्थी जखमी

✔ सुराज्य/सोलापूर

कारने रिक्षाला जोरदार धडक दिल्याने रिक्षा चालकासह दोन विद्यार्थी जखमी झाल्याची घटना १ जुलै रोजी सकाळी सव्वा सात वाजण्याच्या सुमारास बांधकाम भवन कुमठा नाका येथे घडली. याप्रकरणी संतोष बबन गायकवाड (वय-४३, रा. पांडुरंग वस्ती यांनी सदर बाजार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून सागर रामचंद्र जाधव (वय-७१, रा.स्वागत नगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

## भाजपच्या अजेंड्यावर अजूनही विमानसेवा

### व्यापारी आघाडीने मोदींकडे केली मागणी

✔ सुराज्य/सोलापूर

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांच्या बंडाने शहर आणि जिल्ह्यातील वातावरण ढवळून निघाले आहे. असे असले तरी भाजपच्या अजेंड्यावर अजूनही जिल्ह्यातील विमानसेवेला प्राधान्य देण्यात आले आहे. होटगी रोड विमानतळावरून विनाविलंब नियमित विमानसेवा सुरू व्हावी अशी मागणी भाजपच्या व्यापारी आघाडीने सोमवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय नागरी विमान वाहतूकमंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.


व्यापारी आघाडीने वरिष्ठ नेत्यांच्या आदेशानुसार पंतप्रधान कार्यालय आणि विमानमंत्र्यांच्या कार्यालयाला तातडीने एक निवेदन पाठविले. यात म्हटले आहे की, केंद्र सरकारने २०१७ मध्ये उडान योजनेत सोलापूरचा समावेश केला आहे. परंतु सोलापुरातील स्थानिक अडचणीमुळे विमानसेवा सुरू होत नव्हती. शासनाने साखर कारखान्याच्या चिमणीचा अडथळा दूर केला आहे. सोलापूर हा वस्त्रोद्योग, टेक्स्टाईल, शेतीपूरक उद्योग आणि साखर उत्पादक जिल्हा आहे. येथील व्यापार रोजगार वाढीसाठी विमानसेवा लवकरात लवकर सुरू होणे आवश्यक आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सोलापूर जिल्ह्यावर विशेष प्रेम असून ते या जिल्ह्याच्या विकासासाठी प्रयत्नशील आहेत. त्यामुळे केंद्र शासनाने सोलापुरात विमानसेवा लवकरात लवकर सुरू करावी, अशी मागणी भाजपा व्यापारी आघाडीचे प्रदेश कार्यकारणी सदस्य श्रीनिवास दायमा आणि व्यापारी आघाडीचे शहर अध्यक्ष जयंत होले-पाटील यांनी केली.

## उमेश पाटील, जुबेर बागवानसह तीन विधानसभा अध्यक्षांची पक्षातून हकालपट्टी

▸ राष्ट्रवादी कार्यालयातील अजित पवारांची छबी हटवली

▸ बैठकीत शरद पवारांच्या पाठीशी उभे राहण्याचा ठराव



✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयातील अजित पवार यांची छबी असलेला फोटो राष्ट्रवादीच्या युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी हटवला असून शरद पवारांच्या समर्थनार्थ घोषणाबाजी करत शरद पवार यांच्या मागे उभे राहण्याचा ठराव बैठकीत घेण्यात आला. दरम्यान जिल्हाध्यक्ष बळीरामकाका साठे यांनी कार्याध्यक्ष उमेश पाटील यांची हकालपट्टी केली आहे.

बैठकीत राष्ट्रवादीचे सर्वे सर्वा शरद पवार यांच्या पाठीशी उभे राहण्याचा एकमुखी ठराव करून मान्यता देण्यात आली. यावेळी युवक काँग्रेसच्या तरुण कार्यकर्त्यांनी संतप्त झाले. शहर कार्यालयातील आमचे नेते अजित पवार असा नामउल्लेख असलेला फोटो काढण्याची मागणी केली. यावेळी वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी तरुण कार्यकर्त्यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न केला मात्र तरुणांची आक्रमकता पाहून अखेर अजित पवारांचा फोटो काढण्याची नामुष्की पदाधिकाऱ्यांवर आली.

शहर अध्यक्ष भारत जाधव आणि महेश गादेकर म्हणाले की कालपर्यंत अजित पवार आमचे नेते होते मात्र त्यांनी शपथ घेताच आमचा संबंध संपला ते राष्ट्रवादीचे नेते नाहीत आमचे फक्त एकमेव विश्वासार्हता असलेले नेते शरद पवार आहेत. याप्रसंगी माजी महापौर जनार्दन कारमपुरी, शंकर पाटील, मनोहर सपाटे, प्रमोद गायकवाड, प्रशांत बाबर, बिज्जू प्रधाने, चंद्रकांत पवार, दीपक राजगे, सुभाष डांगे, नाना काळे, दिनेश शिंदे, सरफराज शेख, निशांत साळवे, रूपेश भोसले, जावेद खैरादी, प्रमोद भोसले, सुनीता रोटे, लत्ता ढेरे, लता फुटाणे, सुशिला कसपाटे, डॉ. प्रतीक्षा चव्हाण, बिसमिल्ला शिकलगार यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ...यांच्यावर झाली कारवाई

पक्षविरोधी कारवाई केल्याचा ठपका ठेवत युवक काँग्रेसचे सोलापूरचे जिल्हाध्यक्ष जुबेर बागवान यांच्यासह जळगावचे रविंद्र पाटील, बीडचे विजयसिंस बांगर, नाशिकचे अंबादाद खैरे, उपाध्यक्ष अविनाश धायगुडे, सरचिटणीस जगदीश पंचबुध्दे, प्रदेश सचिव श्रीकांत शिंदे यांना पक्षातून हकालपट्टी केली आहे. प्रदेश अध्यक्ष महेबुब शेख यांनी ही कारवाई केली आहे. तर इकडे उत्तर सोलापूर विधानसभा अध्यक्ष प्रकाश जाधव, मध्यविधानसभा अध्यक्ष तन्वीर गुलजार दक्षिण विधानसभा अध्यक्ष अमर शेख यांच्यावर शहरअध्यक्ष भारत जाधव यांनी पक्षविरोधी कारवाई केल्याने पक्षातून बडतर्फ केले आहे.

### धनंजय मुंडे यांच्या प्रतिमेस दुग्धाभिषेक

सोलापूरात मात्र धनजंय मुंडे यांच्या प्रतिमेस दुग्धाभिषेक करण्यात आला फटाके फोडत पेढे वाढत आनंद साजरा केला. धनंजय मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने हा जल्लोष करण्यात आला. राष्ट्रवादीचे प्रदेश सचिव संतोष पवार यांच्यावर देखील कारवाई झाल्याने समजते मात्र या वृत्ता अधिकृत दुजोरा मिळाला नाही

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



उसवल गणगोत सारं...

कल्याण
690-53-256

कल्याण
123-65-113

